# नविन शैक्षणिक धोरण २०२० : २१ वी शताब्दी लक्षप्राप्ती संदर्भाने

**प्रा.अभिजीत अनिलराव पिलखाने**
विभाग प्रमुख लोकप्रशासन विभाग,
चे.शि.प्र. कला वरिष्ठ महाविद्यालय, हर्सूल सावंगी, औरंगाबाद.

★★★

(**मुख्य शब्द :** उच्च शिक्षणाबाबत प्रावधान, भाषेची प्रासंगिकता, शिक्षणाबाबत धोरणे, शिक्षणाचे संस्कृतिकरण इ.)

**प्रस्तावना -** शिक्षण प्रक्रियेला नियंत्रित करणारी सिद्धांत आणि नियम-कायदे यांच्या समुच्चयास शिक्षण-धोरण (ùation Policy) संबाधले जाते. योग्य वेळ आणि स्थानावर योग्य कार्य करण्याच्या कलेला धोरण (Policy) म्हणतात. धोरण, विचारपूर्वक निर्माण सिद्धांताची प्रणाली आहे जे योग्य निर्णय आणि सम्यक परिणाम करण्यास मदत करते. धोरण एक प्रक्रिया (Procedure) आणि कसे राबवयाचे या विषयी  दिनानिर्देश करते.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण :** भारतीय संविधानाच्या चौथ्या भागातील निती निर्देशक तत्वात प्राथमिक स्तरावरील सर्व बालकांना अनिवार्य आणि नि:शुल्क शिक्षण व्यवस्था करणे ही बाब नमुद केली आहे. सन १९४८ मध्ये डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेत विश्वविद्यालय शिक्षण आयोग निर्माण करुन शिक्षण प्रणाली व्यवस्थित स्वरुपात आणण्याचे कार्य हाती घेण्यात आले. १९५२ मध्ये लक्ष्मी मुदलियर अध्यक्षतेत माध्यमिक शिक्षा आयोग, १९६४ मध्ये दौलत सिंह कोठारी अध्यक्षतेत नियुक्त आयोगाच्या शिफारशी आधारे १९६८ शिक्षण धोरण प्रस्ताव प्रकाशित केला गेला. यात राष्ट्रीय विकासाप्रती वचन बद्धता, चारित्रवान तसेच कार्यकुशल युवक युवती तैयार करण्याचे लक्ष संपादित करण्यात आले.

१९८६ सालात राष्ट्रीय शिक्षा धोरण लागु केले ते आजतागायत चालु होते. या दरम्यान राष्ट्रीय शिक्षा धोरणाची समिक्षण करणेसाठी १९९० मध्ये आचार्य राममुर्ती यांच्या अध्यक्षतेखाली तर १९९३ मध्ये प्रो. यशपाल समितीची निर्मिती करण्यात आली.

**कोठारी आयोग -** सन १९६४ मध्ये केंद्र सरकार यांनी डॉ. दौलत सिह कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली शालेय शिक्षण प्रणाली याला नवीन आकार दिशा देणेसाठी आयोगाचे गठन केले, यालाच कोठारी आयोग असे संबोधले जाते. डॉ. कोठारी तेव्हा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष होते शालेय शिक्षणाबाबत विस्तृत स्वरुपात समिश्रण करतांना त्यांनी (कोठारी आयोग १९६४-६६) सामाजिक बदल लक्षात घेऊन शालेय शिक्षणात बदल सुचवत काही ठळक सूचना नमुद केल्या.

१९८६ ते २०२० या कालावधीत असा कोणता सामाजिक, आर्थिक आणि जागतिक बदल झाला ज्या कारणाने नविन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अमलात आणावे लागले. याबाबत उहापोह संबधित शोध प्रत्रिकेत आपण करणार आहोत.

शिक्षण याचा अर्थ अविस्तर शिक्षण प्राप्त करणे जे समाजासाठी उपयुक्त ठरते आणि यातून मनुष्यांचा आंतरीक आणि वैचारिक शक्तीना वाढण्यास मदत होते. शिक्षणाद्वारे प्राप्त ज्ञान आणि कौशल्य आधारे नागरिक घडवण्यास मदत होते. नविन शैक्षणिक धोरण २०२० घोषणा होताच मानव संसाधन मंत्रालय याचे नविन नामकरण शिक्षण मंत्रालय केले गेले. या धोरणा अतंर्गत २०३० पर्यंत १००% (Gross Enrolment Ratio) पूर्ण नामकन अनुपात, केंद्र आणि राज्यसरकार सहयोगाने जीडीपी च्या ६% सार्वजनिक न्याय शिक्षा क्षेत्रासाठी करण्याचे लक्ष्य आहे. राष्ट्रीय शिक्षा धोरणाचे प्रमुख बिंदु खालील आपणास अधोरेखित करता येतात.

**शालेय शिक्षणाबाबत प्रावधान -** नविन शैक्षणिक धोरणात ५+३+३+४ अशी शैक्षणिक सरंचना केली गेली आहे. ३ ते १८ वर्ष वयोगटाचा समोवश होतो.पाच वर्ष Foundational Stage - ३ वर्ष प्री प्रायमरी शाळा आणि ग्रेड १,२ तीन वर्ष साठी प्री-पेट्रेरी स्टेज, तीन वर्ष मध्य (उच्च प्राथमिक) चरण ग्रेड ६,७,८ आणि ४ वर्ष माध्यमिक चरण ग्रेड ९,१०,११,१२, ऱ्हें २०२० अंतर्गत National mission on foundational Literacy and Numeracy स्थापनेचा प्रस्ताव असून २०२५ पर्यंत कौशल्य सुनिश्चित केले जाईल. भाषा आणि संरक्षणात कक्षा - ५ पर्यंत स्थानिक भाषेत शालेय आणि कक्षा - ८ अणि पुढील वर्गासाङ्गी मातृभाषेतून शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले आहे. याबरोबर प्राचीन भारतीय भाषा आणि संस्कृत भाषेचा विकल्पही उपलब्ध करुन देण्यात आला आहे. शारीरिक शिक्षणातंर्गत मार्शल आर्ट, मैदानी खेळ नृत्य योग याचा समावेश करुन शारीरिक हालचाल आणि व्यायाम याचीही उपलब्धता करुन देण्यात आली आहे.

**भारतीय उच्चशिक्षा आयोग -** नविन शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षण संस्थासाठी एक नियामक आणि भारतीय उच्च शिक्षा परिषद (ƕgher Education Commission of India – HECI) तयार करण्याची परिकल्पना केली आहे. भारतीय उच्च शिक्षा आयोग. चिकित्सा आणि कायदा शिक्षण वगळता इतर सर्व उच्च शिक्षण क्षेत्रासाठी एकल विभाग (Single Umbrella Body) रुपात कार्य करेल. शिक्षण क्षेत्रातील डिजीटल शिक्षा संसाधनाना विकसित करणेसाङ्गी वेगळी संरचना आणण्याचे सुनिश्चित करण्यात आले ही संरचना आवश्यक संसाधन, सामग्री आणि क्षमता निर्माण हेतू समन्वयात्मक कार्य करेल.

शालेय शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी करणेसाठी जूनी १०+२ रचनेला आता बदलून ५+३+३+४ करण्यात आले.जसे की ५ (३ ते ८ वर्ष वयगट) जे (एल के जी ते वर्ग ३) अध्ययन ३ (८ ते ११ वयगट) जे ( वर्ग ४ ते ६) अध्ययन करतील ३ (१२ ते १४ वयगट) जे (६ ते ८ वर्ग) अध्ययन४ ( १४ ते १८ वयगट) जे (वर्ग ९ ते १२) अध्ययन करतील.

अतंर्गत भारतात सर्व स्पर्धा परीक्षा एकाच वेळी घेण्याचे नियोजन आहे कारण विद्यार्थी वेगवेगळ्या परिक्षा तयारी करण्याच व्यग्र असायचा, २०२० अतंर्गत अनेक परिक्षा ऐवजी एकच कॉमन एट्रेस टेस्ट जसे जेईई मेस् जेई एडवास डब्लूडी जेई अशा अनेकविध ऐवजी एकच परिक्षा द्यावी लागणार.

''खेलकुद के साथ शिक्षा इस धरोहर पर'' या विचाराने NEP चे स्वरुप दिसते.महाविद्यालय शैक्षणिक जिवनात १ वर्षाचे शिक्षण पूर्ण करणाऱ्यास काही कारणास्तव शिक्षण सोडल्यास १ वर्ष कॉलेज प्रमाणपत्र, २ वर्षाने सोडल्यास Diplorम तर ३ वर्षाने सोडल्यास Bachelor Degree आणि पूर्ण ४ वर्ष केली असता Level Research Degree दिली जाईल. अर्धवट शिक्षण सोडणाऱ्या विद्यार्थ्यास परत नव्याने सुरु न करता जिथे सोडले तेथून सुरुवात हा विकल्प आहे. तसेच NEP अंतर्गत M.Phil (Master of Philosophy) डिग्री संपुष्टात आणून १००% (GRE) Graduate Record Examination हे लक्ष समोर ठेवले आहे.

शिक्षकांसाठी ४ वर्षाच्या अभ्यासक्रम या कालावधीत मुलांना कोणत्या प्रकारे अध्यपन केले जावे. याबाबत प्रबोधन आणि प्रशिक्षण, कोडीग आणि मातृभाषेतून शिक्षण देणे इ. बोर्ड परिक्षेचा दबाब विद्यार्थीवर्गावर कमी करणेसाठी सहामाही पद्धतीने परिक्षा Semister स्वरुपात होईल व ज्यात अधिकचे गुण प्राप्त होतील ते ग्राह्य धरण्यात यावे ही यातील विशेषबाब आहे. नविन शैक्षणिक धोरण २०२० हे शैक्षणिक वर्ष २०२२ पासून अंमलात आणण्याचा शासनाचा विचार कोरोना ससंर्गजन्य रोगाच्या जागतिक व्याप्तीने शक्य होणार नाही असे शैक्षणिक तज्ञांचे मत आहे.

मातृभाषेतून शिक्षण धोरणाने मातृभाषेतील शिक्षकांची असलेली कमतरता ही भासणार नाही कारण या शिक्षकांची भरती कराव्याच लागतील.०४ वर्षाचे होण्याचे कारण गुणवत्ता पूर्वक शिक्षकांची उपलब्धता व्हावी हा उद्देश अंत: केंद्रित मंत्रीमंडळाने २१ वी शतकातील भारत यात शिक्षणात शारारीक, मानसिक आणि जागतिक स्पर्धाला सामोरे जाणारे असे शैक्षणिक अभ्यासक्रम सर्व वयोगासाठी निर्माण केले आहे.

**सारांश** देशातील शिक्षण व्यवस्थेत जवळपास ३४ वर्षानी बदल करण्यात येऊन प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षण तर स्तानक स्तर हा ०४ वर्षाचा केला आहे. प्राथमिक ते विश्वविद्यालय शिक्षण पद्धतीत बदल करणारी नविन शैक्षणिक धोरण २०२०, केंद्रिय सरकारने बुधवारी २९ जुलाई रोजी घोषणा करुन मानव संसाधन मंत्रालय याचे नाव बदलून शिक्षण / शिक्षा मंत्रालय करण्यात आले. या नव्या शैक्षणिक धोरणात व्यवहारीकता आणि कौशल्य विकासावर भर देण्यात आला आहे. नविन शिक्षण धोरणात अधोरेखित खालील महत्वाच्या बाबीत पाचवी वर्गापर्यंत मातृभाषेतून शिक्षण आणि शक्य असल्यास आठवी आणि त्यापुढील वर्गासाठी मातृभाषेतून शिक्षणाचा पर्याय खुला असावा. यात हिंदी, इंग्रजी बरोबरच स्थानिक भाषा विषय पाठ्यक्रमात असावे, देशातंर्गत १०+२ ही प्रचलित पद्धत बदलून ५+३+३+४ या रुपात पाठ्यक्रमाची निर्मिती प्रायमरी ते वर्ग दुसरा एक, तर तिसरी ते पाचवी दुसरा आणि साहवी ते आठवी तिसरा व नववी ते १२ वी हा चौथा आणि वर्गीकरणातील शेवटचा टप्पा असवा, बोर्ड परिक्षा कायम ठेऊन ज्ञान आधारीत करण्यात आली आहे.

नविन शैक्षणिक धोरणात मुल्यमापन करतांना आता तीन पद्धतीचा अवलंब होईल एक स्वत: मुल्यमापन करणे दुसरे सहपाठी मार्फत आणि तिसरे अध्यापका मार्फत वर्ग सहा पासून कोडिंग शिक्षण जे की कौशल्य विकासाचा एक महत्वपूर्ण भाग ठरेल, स्नातक (Graduate) ३ वर्ष ऐवजी ४ वर्षाचे आणि ४ वर्ष पूर्ण केल्यावर १ वर्षात (Graduate) स्तातकोत्तर पदवी मिळवू शकेल. एम.फिल पूर्ण स्वरुपात संपुष्टात आणून एम.ए. नंतर विद्यावाचस्पती (Ph.D) करता येईल. नविन धोरणात खाजगी आणि शासकीय विद्यापीटासाठी नियम एकच असतील, राष्ट्रीय पाली संस्था, पारसी आणि प्राकृत भारतीय अनुवाद संस्था आणि व्याख्या याची स्थापना करण्यात येईल.

नवीन शैक्षणिक धोरण भारतास प्रगती आणि नविनतम शोध निर्मितीचे केंद्रबिंदू ठरणारे असावे अशा पद्धतीने प्रत्येक वयोगटाचा विचार करुन हे धोरण निर्माण करण्यात आले आहे.